पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १९

**सभावृत्तांत**

दिनांक - **२७/०२/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **मंगळवार** दिनांक **२७/०२/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.सागर बाळासाहेब गवळी - सभापती
२. मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे - उपसभापती
३. मा.कदम शशिकांत गणपत
४. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
५. मा.कलाटे मयुर पांडुरंग
६. मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला -**

विषय क्र.४) कलम ३७ अन्वये मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र.२/१५४ खेळाचे मैदान हे आरक्षण रद्द करणेबाबत - मा.विकास डोळस, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव...

----------

दिनांक **१४/०२/२०१८** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.१८)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ५२ विषय क्रमांक - ०१
दिनांक - २७/०२/२०१८ विभाग – नगररचना व विकास
सुचक : मा.शैलेश मोरे अनुमोदक : मा.कदम शशिकांत
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१८/१७३/२०१७, दि.२५/०९/२०१७

विषय - मौजे किवळे येथील स.नं.३९ ते ७१ येथील मंजूर विकास योजनेतील १८.०० मी.रस्त्याखालील क्षेत्राचे भूसंपादन करणेबाबत

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ५३ विषय क्रमांक - ०२

दिनांक - २७/०२/२०१८ विभाग – नगररचना व विकास

सुचक : मा. कलाटे मयुर अनुमोदक : मा.विकास डोळस

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१८/१७४/२०१७, दि.२५/०९/२०१७

विषय : मौजे किवळे येथील स.नं. ७३, ७४, ७५ व ७६ येथील मंजूर विकास योजनेतील १२.०० मी. रस्त्याखालील क्षेत्राचे भूसंपादन करणेबाबत.

विषय क्रमांक ०२ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५४ विषय क्रमांक - ०३

दिनांक - २७/०२/२०१८ विभाग – नगररचना व विकास

सुचक : मा. कलाटे मयुर अनुमोदक : मा.शैलेश मोरे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१३/५४/२०१५, दि.११/०५/२०१५

विषय : पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी येथील दक्षिणोत्तर १२.० मी. रुंद रस्त्यापासून ते एम.आय.डी.सी. हद्दीपर्यंत स.नं.१५ पै. व १४ पै. मधील २४ व १२ मी. रुंद (पुर्व-पश्चिम) रस्त्याचे क्षेत्र भूसंपादनाबाबत.

विषय क्रमांक ०३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला –**

ठराव क्रमांक - ५४ विषय क्रमांक - ०४

दिनांक - २७/०२/२०१८

सुचक : मा.विकास डोळस अनुमोदक: मा.शशिकांत कदम

संदर्भ: मा.विकास डोळस, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव

मौजे बोपखेल येथील स.नं.१४७ मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालितेच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र.२/१५४ खेळाचे मेदान हे आरक्षण असून सदर बाधित आरक्षणा मध्ये लोकांची घरे, तसेच त्यांचे वहीवाटीचे रस्ते आहेत. सदर आरक्षण विकसात झाल्यास अनेक लोक भूमीहीन तसेच बेघर होतील. सद्य स्थितीत बोपखेल स.नं. १ मध्ये आरक्षण क्र.२/१६७ खेळाचे मैदान हे विकसीत करण्याची कार्यवाही चालू असल्याने आरक्षण क्र. २/१५४ खेळाचे मैदान ह्या आरक्षणाची गरज भासत नाही. तरी सदरच्या प्रस्तावावर कलम ३७ अन्वये रद्द करणेची कार्यवाही करण्यास मान्यता देणेत येत आहे.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सागर बाळासाहेब गवळी)**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/९१/२०१८
दिनांक : ०८/०३/२०१८



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.